दिनांक: २३/०६/२०२६

# नोटीस

## (प्रथम वर्षानंतर अभ्यासक्रम बदल किंवा संस्थाबदल करणेस इच्छुक विद्यार्थ्याकरिता)

संदर्भ- १) तंत्र शिक्षण संचालनालय परिपत्रक क्रमांक १०/ पदविका-मा.प्र/विद्यार्थी बदली/२०२६/ ३०२, दिनांक - २२ जून २०२६

२) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पदविका अभ्यासक्रमाचे माहिती पुस्तक

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ज्या इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांना प्रथम वर्षानंतर अभ्यासक्रम बदल **(कोर्स चेंज)** किंवा संस्था बदल हवे असतील, अशा विद्यार्थ्यांनी सोमवार दिनांक २९ जून २०२६ पर्यंत आपले अर्ज विहित नमुना प्रपत्र (Annexure A) व त्यासोबतची संबंधित कागदपत्रे जोडून प्रा. महेश घोसाळकर (९९२२२३२५२६) यांच्याकडे द्यावीत.

**सदर अभ्यासक्रम व संस्था बदल हे केवळ तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी पारित केलेली संदर्भीय माहितीपुस्तिका व परिपत्रके मधील नमूद नियम तथा तरतुदीस अधीन राहून तसेच संस्थेमधील उपलब्ध रिक्त जागा विचारात घेऊनच केले जातील. यामध्ये विशेष बाब म्हणून कोणतेही नियम शिथील करण्याचे प्राधिकार नमूद नाहीत. याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

ज्या विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षातील प्रथम वर्षाची पूर्ण फी अदा केली असेल असे विद्यार्थी अभ्यासक्रम किंवा संस्था स्थलांतरण अर्ज करू शकतात. **अभ्यासक्रम बदल** मागणी करताना अपूर्ण अर्ज किंवा आवश्यक कागदपत्राविना सादर केलेले अर्ज तसेच **विहित मुदतीनंतर सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.**

अधिसंख्य विद्यार्थी (TFWS, EWS कोटा) मधील विद्यार्थी प्रवेशित विद्यार्थी, एकापेक्षा जास्त विषयात अनुत्तीर्ण विद्यार्थी हे अभ्यासक्रम किंवा संस्था बदलासाठी पात्र नाहीत.

तंत्र शिक्षण संचनालयाने पारित केलेले नियम व तरतुदीस अधीन राहून तसेच व उपलब्ध रिक्त जागा विचारात घेऊन झालेले अभ्यासक्रम किंवा संस्था स्थलांतरण हे विद्यार्थ्यांच्या विनंतीनुसारच होत असल्याने होणाऱ्या शैक्षणिक परिणामास स्वतः विद्यार्थी जबाबदार राहतील.

अभ्यासक्रम किंवा संस्था स्थलांतरण मागणीसाठीचा Annexure A प्रपत्र नमुना ऑफिसमध्ये अपुर्वा सुतार यांचेकडे उपलब्ध आहे. (वेळ ९.३० ते २) कोर्स बदलासाठी अर्जाचे रजिस्ट्रेशन साठी रुपये चारशे रुपये चार्ज पडेल. यासोबत मागील वर्षाची सर्व सत्र गुणपत्रिका झेरॉक्स (सत्यप्रत) व मागील वर्षाचे अलॉटमेंट लेटर प्रवेश पत्र २०२५-२६ जोडावे.

न्यू इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी
डी.टी.ई. कोड ६४०२
उचगाव, कोल्हापूर

डायरेक्टर
(डॉ. संजय एच. दाभोळे)
न्यु इन्स्टिटयूट ऑफ टेक्नोलॉजी, कोल्हापूर.
२६४, शांतीनगर, उचगाव पूर्व, कोल्हापूर-४१६००५.